असा. क्र. ३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जानेवारी ४, २००८/पौष १४, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.**—मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. | ४-७ |

दिनांक २ जानेवारी २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ जानेवारी २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

सन १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** आता यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम २६७अ समाविष्ट करणे. २. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम २६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई ५९.

अवैध इमारतीवर शास्ती बसविणे. " **२६७अ.** (१) जो कोणी,—

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून आपल्या जमिनीवर ;

(ब) प्रादेशिक नियोजन व नगररचनेशी संबंधित कायद्यान्वये मान्यता न घेता तयार केलेल्या आपल्या मालकीच्या जागेवर ;

(क) या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी अथवा हा अधिनियम किंवा असा नियम किंवा उपविधी यांअन्वये वैधरीत्या दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली मागणी यांचा भंग करून आपल्या जमिनीवर ; किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करून महानगरपालिका, अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल :

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही—मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल.".

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**३.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम २८२ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम २८२अ समाविष्ट करणे.

“ **२८२अ.** (१) जो कोणी,— अवैध इमारतीवर शास्ती बसविणे.

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून आपल्या जमिनीवर ;

(ब) प्रादेशिक नियोजन व नगररचनेशी संबंधित कायद्यान्वये मान्यता न घेता तयार केलेल्या आपल्या मालकीच्या जागेवर ;

(क) या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी अथवा हा अधिनियम किंवा असा नियम किंवा उपविधी यांअन्वये वैधरीत्या दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली मागणी यांचा भंग करून आपल्या जमिनीवर ; किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करून महानगरपालिका, अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल :

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही—मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल.”.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम १८९अ समाविष्ट करणे.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १८९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

अवैध इमारतीवर शास्ती बसविणे.

" १८९अ. (१) जो कोणी,—

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून आपल्या जमिनीवर ;

(ब) प्रादेशिक नियोजन व नगररचनेशी संबंधित कायद्यान्वये मान्यता न घेता तयार केलेल्या आपल्या मालकीच्या जागेवर ;

(क) या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी अथवा हा अधिनियम किंवा असा नियम किंवा उपविधी याअन्वये वैधरीत्या दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली मागणी यांचा भंग करून आपल्या जमिनीवर ; किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करून नगरपरिषद अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल :

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावता जाणार नाही—मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल.".

असा. क्र. ६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८


# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, जानेवारी १६, २००८/पौष २६, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

---

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार, दिनांक ४ जानेवारी २००८, पृष्ठ क्रमांक ४ ते ७, वर प्रकाशित करण्यात आलेल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००७ (२००८ चा महा. २) मध्ये,—

(१) पृष्ठ क्रमांक ४ वर, ओळ क्रमांक १३ मध्ये, " **ज्याअर्थी,** आता यापुढे " **या ऐवजी** " **ज्याअर्थी,** यात यापुढे " **असे वाचावे** ;

(२) पृष्ठ क्रमांक ७ वर, ओळ क्रमांक २४ मध्ये, " अन्वयार्थ लावता जाणार नाही " **या ऐवजी** " अन्वयार्थ लावला जाणार नाही " **असे वाचावे** ;





शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. २ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ४, २००८/पौष १४, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Provincial Municipal Corporations, the City of Nagpur Corporation and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2007 (Mah. Act No. II of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. II OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 4th January 2008.)*

An Act further to amend the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965.

Bom. LIX of 1949. C. P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-eighth Year of the Republic of India as follows :—

Short title.

**1.** This Act may be called the Bombay Provincial Municipal Corporations, the City of Nagpur Corporation and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2007.

Insertion of section 267A in Bom. LIX of 1949.

**2.** After section 267 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the following section shall be inserted, namely :— Bom. LIX of 1949.

Levy of penalty on unlawful building.

"**267A.** (*1*) Whoever unlawfully constructs or reconstructs any building or part of a building,–

(*a*) on his land without obtaining permission under this Act or any other law for the time being in force or in contravention of any condition attached to such permission ;

(*b*) on a site belonging to him which is formed without approval under the relevant law relating to Regional and Town Planning ;

(*c*) on his land in breach of any provision of this Act or any rule or bye-law made thereunder or any direction or requisition lawfully given or made under this Act or such rule or bye-law ; or

(*d*) on any land, belonging to, or leased by, the Corporation, or the Central or State Government, or any statutory corporation or organization or company set up by any such Government, in breach of any provision of this Act or of any other law for the time being in force and the rules or bye-laws made thereunder,

shall be liable to pay every year a penalty, which shall be equal to twice the property tax leviable on such building, so long as it, remains as unlawful construction, without prejudice to any proceedings which may be instituted against him in respect of such unlawful construction :

Provided that, such levy and collection of tax and penalty shall not be construed as regularization of such unlawful construction or reconstruction for any period whatsoever of its such unlawful existence.

(*2*) Penalty payable unders sub-section (*1*) shall be

determined and collected under the provisions of this Act, as if the amount thereof were a property tax due by such person.".

C.P. and Berar II of 1950.

**3.** After section 282 of the City of Nagpur Corporation Act, 1948, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 282A in C. P. and Berar II of 1950.

"**282A.** (*1*) Whoever unlawfully constructs or reconstructs any building or part of a building,— Levy of penalty on unlawful building.

(*a*) on his land without obtaining permission under this Act or any other law for the time being in force or in contravention of any condition attached to such permission ;

(*b*) on a site belonging to him which is formed without approval under the relevant law relating to Regional and Town Planning ;

(*c*) on his land in breach of any provision of this Act or any rule or bye-law made thereunder or any direction or requisition lawfully given or made under this Act or such rule or bye-law ; or

(*d*) on any land, belonging to, or leased by, the Corporation, or the Central or State Government, or any statutory corporation or organization or company set up by any such Government, in breach of any provision of this Act or of any other law for the time being in force and the rules or bye-laws made thereunder,

shall be liable to pay every year a penalty, which shall be equal to twice the property tax leviable on such building, so long as it remains as unlawful construction, without prejudice to any proceedings which may be instituted against him in respect of such unlawful construction :

Provided that, such levy and collection of tax and penalty shall not be construed as regularization of such unlawful construction or reconstruction for any period whatsoever of its such unlawful existence.

(2) Penalty payable under sub-section *(1)* shall be determined and collected under the provisions of this Act, as if the amount thereof were a property tax due by such person.".

Insertion of section 189A in Mah. XL of 1965.

**4.** After section 189 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, the following section shall be inserted, namely :— Mah. XL of 1965.

Levy of penalty on unlawful building.

"**189A.** *(1)* Whoever unlawfully constructs or reconstructs any building or part of a building,–

(*a*) on his land without obtaining permission under this Act or any other law for the time being in force or in contravention of any condition attached to such permission ;

(*b*) on a site belonging to him which is formed without approval under the relevant law relating to Regional and Town Planning ;

(*c*) on his land in breach of any provision of this Act or any rule or bye-law made thereunder or any direction or requisition lawfully given or made under this Act or such rule or bye-law ; or

(*d*) on any land, belonging to, or leased by, the Council, or the Central or State Government, or any statutory corporation or organization or company set up by any such Government, in breach of any provision of this Act or of any other law for the time being in force and the rules or bye-laws made thereunder,

shall be liable to pay every year a penalty, which shall be equal to twice the property tax leviable on such building, so long as it remains as unlawful construction, without prejudice to any proceedings which may be instituted against him in respect of such unlawful construction :

Provided that, such levy and collection of tax and penalty shall not be construed as regularization of such unlawful construction or reconstruction for any period whatsoever of its such unlawful existence.

(2) Penalty payable under sub-section *(1)* shall be determined and collected under the provisions of this Act, as if the amount thereof were a property tax due by such person.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई